भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७२२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २१/१०/२०१७

**१) महिलेचा विनयभंग करुन मारुन टाकण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक २०/१०/२०१७ चे १०.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी ही स्वत:चे शेतावर कच्या रोडने एकटी जात असता यातील आरोपीने तिला एकटी पाहुन शिवीगाळ करुन विनयभंग करुन पुढे मारुन टाकण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ३५४(अ)(१)(ब),५०४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परतेती पो.स्टे आंधळगाव हे करीत आहेत.

**२) संगनमत करुन भांडण व शिवीगाळ करुन महिलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १९/१०/२०१७ चे १९.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी ही दारुबंदी समितीची अध्यक्ष असुन घरचे अंगणात दिवाळी निमीत्त दिवे लावीत असता दारुबंदी समितीचा सदस्य याने फिर्यादी हीस आरोपीचे घरासमोर बोलविले असता यातील आरोपी क्र १ व २ यांनी संगनमत करुन फिर्यादी सोबत भांडण व शिवीगाळ करुन तिचा विनयभंग केला व आरोपी क्र. ३ ने बुक्याने तोंडावर व काठीने कपाडावर डावे बाजुला मारुन दुखापत केल्याने फिर्यादींचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३५४,३२४,५०४,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. डहाके पो.स्टे पवनी हे करीत आहेत.

**३) दारु विक्रीच्या कारणावरुन बासाच्या काठीने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १९/१०/२०१७ चे १९.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा त्याचे लहान भाऊ प्रफुल यास काकाचे घरी बोलवण्यास गेला असता तेथे गावातील दारुबंदी समितीचे लोक हे काका व विछीन्द्र रंगारी यांचे सोबत बोलत असता यातील आरोपी क्र १ ते ४ यांनी संगनमत करुन तेथे येवुन फिर्यादीस तुम्ही सर्वजन गावात दारु विक्री करता असे म्हणुन आरोपी क्र. १ ने फिर्यादीस अश्लिल शब्दात शिवीगाळ केली व मारल्या शिवाय दारु विक्रीचा धंदा बंद करणार नाही अशी धमकी दिली. व आरोपी क्र. ४ ने त्याचे घरुन बासाची काठी आणुन फिर्यादीचे हातावर, छातीवर मारले व आरोपी क्र. २ व ३ यांनी फिर्यादीस खाली पाडुन लाथा बुक्यांनी मारुन जखमी केल्याने फिर्यादी पंकज मछीन्द्र रंगारी वय २२ वर्ष, रा. ब्रम्ही यांचे डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २९४,३२३,५०६,३४ भादवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. बावणे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**४) दारुबंदी केलीच्या कारणावरुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १९/१०/२०१७ चे २३.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही तिचे घरी हजर असतांनी यातील आरोपी हा दारु पाणी पेवुन फिर्यादीचे घरासमोर जावुन व तिला पाहुण तुम्ही गावात दारुबंदी केली ? असे बोलुन तिला अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २९४,५०६ भादवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सतदेवे. पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**५) काठीने डोक्यावर मारुन जखमी करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २०/१०/२०१७ चे १९.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी सुरेश दामोधर बंडे वय ५० वर्ष, रा. वैजेश्वर वार्ड पवनी हा घरी टिव्ही पाहत बसला असता त्याचा आरोपी मुलगा हा बाहेरुन दारु पाणी पिवुन घरी आला व म्हणाला मी दारु पाणी पिवुन शिवीगाळ करतो असे तुम्ही माझी बाहेर बदनामी केली? असे म्हणुन शिवीगाळ करुन थापड बुक्यांनी मारहान करुन खाली पाडल्याने फिर्यादीचे डावे हाताचे कोनीवर जखम झाली तसेच आरोपीने बांबुचे काठीने फिर्यादीचे डोक्यावर मारुन जखमी केल्याने व जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**६) विष बाधा होवुन औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु. :—**

दिनांक १९/१०/२०१७ चे १०.४५ वाजता दरम्यान यातील मृतक राजेश हरीचंद्र शहारे वय ३९ वर्ष, रा. कातुर्ली हा शेतामध्ये धनावर औषध फवारणी करीत असतांनी मृतक यास विष बाधा झाल्याने त्यास सामान्य रुग्णालय भंडारा येथे औषधोपचारा करीता भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पोस्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे मर्ग डायरी टपालाने प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. भोंगाडे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. डोगरे पो.स्टे अडयाळ हे करीत आहेत.

**७) वैनगंगा नदीचे पाण्यात उडी घेवुन विवाहीतेचा मृत्यु . :—**

दिनांक १९/१०/२०१७ चे १४.०० ते दिनांक २०/१०/२०१७ चे ११.३० वाजता दरम्यान यातील मृतक महिला सौ. पौर्णीमा आशीष शेन्डे वय २४ वर्ष, रा. कस्तुरबा गांधी वार्ड ही दिनांक १९/१०/२०१७ चे वाजरा दरम्यान घरी कोणालाही न सांगता तिला लोक उधारीचे पैसे मागण्यास घरी येत असल्याने ति घरुन काही न सांगता निघुन गेली व वैनगंगा नदीचे पाण्यात उडी घेवुन आत्महत्या केल्याने दिनांक २०/१०/२०१७ चे ११. ३० वाजता दरम्यान मृतकचे शव वैनगंगा नदीचे पाण्यात मिळुन आल्याने फिर्यादी आशीष संजय शेंन्डे वय २६ वर्ष, रा. कस्तुबा गांधी वार्ड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. थेर पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**८) कॅनलचे पाण्यात बुडुन इसमाचा मृत्यु :—**

दिनांक १९/१०/२०१७ चे १४.०० ते दिनांक २०/१०/२०१७ चे ०८.०० वाजता दरम्यान यातील मृतक प्रकाश मार्कड दुर्गे वय ३० वर्ष, रा. खात हा रामटेक ते भंडारा पाण्याच्या कॅनल कडे संडासला गेला होता व संडास धुत असतांनी कॅनलचे पाण्यात बुडुन मरण पावल्याने फिर्यादी नागोराव मार्कड दुर्गे वय ३२ वर्ष, रा. खात जि. नागपुर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. उबाडे पो.स्टे वरठी हे करीत आहेत.

**९) जळुन औषधोपचारा दरम्याम महिलेचा मृत्यु :-**

दिनांक १९/१०/२०१७ चे २१.३० वाजता दरम्यान यातील मृतक सौ. ललीता उमरु सेलोकर वय ३३ वर्ष, रा. जेवनाळा ही जळाल्याने तिला औषधोपचारा सामान्य रुग्णालय भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉक्टरी मेमो वरुन पोस्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोशि. वंजारी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कोल्हे पो.स्टे पालांदुर हे करीत आहेत.

**१०) औषधोपचारा दरम्यान युवकाचा मृत्यु :-**

दिनांक १९/१०/२०१७ चे १०.५० वाजता दरम्यान यातील मृतक प्रवीण डोमा सिरसाम वय २७ वर्ष, रा. सुंदरटोला याने अती दारु सेवन केल्यामुळे त्यास औषधोपचारा करीता भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉक्टरी मेमो वरुन पोस्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोशि. मिसाळ यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. कुरुडकर पो.स्टे गोबरवाही हे करीत आहेत.

**११) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :-**

दिनांक २०/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ३४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती १२ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती २२ केसेस करण्यात आले आहे.

(पोउपनी. ए. बी. तुळजेवार)
अपर पोलीस अधिक्षक
वाचक फौजदार भंडारा
दुरध्वनी.क्र. ७७६८८६९९७७

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.